# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 17/03/2020 (मंगळवार)
## (सायंकाळ)

---

### आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. काटोल :- पो.स्टे. काटोल येथे दिनांक 27/01/2012 चे 23.30 वा. दरम्यान फिर्यादी सर. तर्फे पोलिस उप निरीक्षक श्री. अरविंद सराफ स्थानिक गुन्हे शाखा नागपूर जिल्हा ग्रामिण यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे.काटोल येथे अप. क्र. 11/2012 कलम 286, 34 भादंवि सह कलम 3, 5 भारतीय विस्फोटक पदार्थ कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 27/01/2012 चे 13.30 वा. ते 17:30 वा. दरम्यान आरोपी नामे- मारोती शिवाजी वरठी, वय 65 वर्ष, रा. मरगसूर ता. काटोल जिल्हा नागपूर व 1 मृतक या दोघांनी संगणमत करून अवैद्यरीत्या स्फोटक पदार्थ आपले जवळ बाळगुन त्याचा उपयोग गावठी बॉम्ब तयार करण्याकरीता करून सदर स्फोटक पदार्थामुळे जिवितास हानी होवु शकते हे माहिती असुन सुध्दा गैर कायद्याने स्फोटके तयार करून त्याचा वापर केला. आरोपीला दिनांक 27/01/2012 चे 23.30 वा. अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. पंकज जाधव, पो.स्टे. काटोल यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक 17/03/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. सुनील मा. पाटील न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला 1) कलम 5 विस्फोटक पदार्थ अधिनीयम कायद्यान्वये 3 वर्ष 6 महीने सक्त मजुरीची शिक्षा व 2,000/-रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सहायक सरकारी अभियोक्ता श्री दुबे तर आरोपीचे वतीने श्री. व्यंकटराव नेहारे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी कर्मचारी म्हणुन स.फौ. वासुदेव मस्के, शंकर तराळे, पो.हवा. शेखर मेश्राम तीन्ही नेमणुक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामिण व पो.हवा. बबन बहादुरे पो.स्टे. काटोल यांनी मदत केली आहे.

### गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. मौदा :- अंतर्गत 20 कि. मी. अंतरावर मौजा हिवराबली जंगलातील पहाडीवर येथे दिनांक 15/03/2020 चे 17:30 वा. सुमारास फिर्यादींचा मुलगा नामे- प्रवीण क्रिष्णा कारेमोरे, वय 22 वर्ष, रा. झोपडपट्टी खात ता. मौदा हा हिवराबली येथील पहाडी जंगलात फिरत आहे, असे शेजारी राहणारा हर्ष ठवकर, रा. खात यांने सांगीतले. तेव्हा फिर्यादी त्यास पाहण्यास गेले असता फिर्यादीच्या मुलाने अज्ञात कारणाने पळसाच्या झाडयाच्या फांदयाला हिरव्या रंगाचे दुपट्टयाने बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- क्रिष्णा बळीराम कारेमोरे, वय 52 वर्ष, रा. झोपडपट्टी खात ता मौदा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा देशमुख 9922447045 हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 22 कि. मी. अंतरावर मौजा राउळगाव येथे दिनांक 15/03/2020 चे 22.50 वा. दरम्यान सौ. सुंदरीया लखनसिंग उईके, वय 40 वर्ष, रा. राउळगाव यांनी पायाच्या त्रासाला कंटाळुन विषारी औषध प्राशन केले. त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय, कळमेश्वर येथे नेले असता उपचारापुर्वी त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— लखनसिंग भगतसिंग उईके, वय 40 वर्ष, रा. राउळकर, ता. काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार सुनिल कामडी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर